स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक 10–08–2015** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 9. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 10. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 11. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 12. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 13. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 14. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 2. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 140:– मौजा – जयताळा, खसरा क्र. 122 व 162, या जागेवरील आरक्षण क्र. MW-47 (Park) क्षेत्र –3.09 हे.आर. जागा संपादित करण्याबाबत.

मौजा–जयताळा, खसरा क्र. 122 व 162, या जागेवरील आरक्षण क्र. MW-47 (Park) क्षेत्र –3.09 हे.आर. या जागेचे मालक मे. श्री. मारोती देवस्थान तर्फे श्री. विनोद यशवंतराव गुडधे यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम –1966, चे

कलम –127 अन्वये दिनांक 01.02.2013 रोजी खरेदी सुचना महानगरपालिकेस बजावली आहे.

सदर्हु जागेचे भुसंपादन करण्याकरीता कार्यलयीन पत्र क्र. मनपाना/नरवि/1407 दिनांक 27.02.2013 अन्वये जागेच्या मोबदल्यात टी.डी.आर. घेण्यासाठी कळविले होते. आवेदकाने जमिनीचा मोबदला टी.डी.आर. स्वरूपात घेण्याचे दिनांक 16.04.2013 चे पत्रानुसार नाकारले असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम –1966 चे कलम –125 व 126 मध्ये नमूद नुसार भुसंपादन अधिनियम –1894 अन्वये भुसंपानदासाठी कलम –6 ची अधिसुचना काढुन भुसंपादनाची कार्यवाही करणे गरजेचे आहे. अन्यथा भुसंपादनाची कार्यवाही न केल्यास जागेवरील आरक्षण व्यपगत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर्हु जागेचे भुसंपादनाकरीता अंदाजीत रक्कम वर्ष 2013–2014 चे शिघ्रगणका नुसार रू. 60,76,48,500/– ची तरतुद मिळण्यासाठी सदरर्हु प्रस्तावास स्थायी समितीने अंतिम निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयातील प्रकरणात जमिनीवरील विकास योजनेचे आरक्षण व्यपगत झाल्यामुळे व प्रशासनाने विहीत कालावधीत प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविला नाही असे स्पष्ट झाल्यामुळे या प्रकरणात प्रशासनाने आपल्या स्तरावर नियमानुसार व कायदयाच्या चाकोरीत निर्णय घ्यावा या सुचनेस एकमताने मंजूरी प्रदान करते.

सदर्हु प्रकरणात विकास योजनेतील सार्वजनीक प्रयोजनासाठीचे आरक्षण व्यपगत झाले असे दिसुन येते त्यामुळे या प्रकरणात दोषी विरुध्द प्राथमिक चौकशी सूरु करण्याचे निर्देश हि स्थायी समिती प्रशासनास देते.

तसेच विकास आराखडयातील सार्वजनिक प्रयोजनासाठी जागांची आवश्यकता तपासणे अश्या आरक्षणाची म.न.पा. ला भविष्यातील दुरुगामी विचार करुन आरक्षीत जागा भुसंपादन करण्याचा निर्णय घेणे व ज्या जागांची आवश्यकता नाही. किंवा वगळण्याबाबत यांची स्पष्टता करुन योग्य प्रस्ताव विभागाने सादर करणे काळाची गरज आहे. या करीता ही स्थायी समिती, स्थायी समितीची उपसमिती गठीत करण्यास मान्यता प्रदान करते व समिती गठीत करण्याचे अधिकार अध्यक्ष स्थायी समिती यांना प्रदान करते यांस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 141</u>:– मौजा – जयताळा, खसरा क्र. 119 व 121/1, या जागेवरील आरक्षण क्र. MW-46 (Secondary School) क्षेत्र –2.03 हे. आर. जागा संपादित करण्याबाबत.

मौजा–जयताळा, खसरा क्र. 119 व 121/1, या जागेवरील आरक्षण क्र. MW-46 (Secondary School) क्षेत्र –2.03 हे.आर. या जागेचे मालक सौ. कल्पना अशोक ठाकरे तर्फे आममुख्त्यार श्री. प्रफुल्ल विनोद गुडधे यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम –1996, चे कलम –127 अन्वये दिनांक 01.02.2013 रोजी खरेदी सुचना महानगरपालिकेस बजावली आहे.

सदर्हु जागेचे भुसंपादन करण्याकरीता कार्यलयीन पत्र क्र. मनपाना/नरवि/1406 दिनांक 27.02.2013 अन्वये जागेच्या मोबदल्यात टी.डी.आर. घेण्यासाठी कळविले होते. आवेदकाने जमिनीचा मोबदला टी.डी.आर. स्वरूपात घेण्याचे दिनांक 07.03.2013 चे पत्रानुसार नाकारले असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम –1966 चे कलम –125 व 126 मध्ये नमूद नुसार भुसंपादन अधिनियम

–1894 अन्वये भुसंपानदासाठी कलम –6 ची अधिसुचना काढुन भुसंपादनाची कार्यवाही करणे गरजेचे आहे. अन्यथा भुसंपादनाची कार्यवाही न केल्यास जागेवरील आरक्षण व्यपगत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर्हु जागेचे भुसंपादनाकरीता अंदाजीत रक्कम वर्ष 2013–2014 चे शिघ्रगणका नुसार रू. 40,97,04,750/– ची तरतुद मिळण्यासाठी सदरर्हु प्रस्तावास स्थायी समितीने अंतिम निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयातील प्रकरणात जमिनीवरील विकास योजनेचे आरक्षण व्यपगत झाल्यामुळे व प्रशासनाने विहीत कालावधीत प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविला नाही असे स्पष्ट झाल्यामुळे या प्रकरणात प्रशासनाने आपल्या स्तरावर नियमानुसार व कायदयाच्या चाकोरीत निर्णय घ्यावा या सुचनेस एकमताने मंजूरी प्रदान करते.

सदर्हु प्रकरणात विकास योजनेतील सार्वजनीक प्रयोजनासाठीचे आरक्षण व्यपगत झाले असे दिसुन येते त्यामुळे या प्रकरणात दोषी विरुध्द प्राथमिक चौकशी सूरु करण्याचे निर्देश हि स्थायी समिती प्रशासनास देते असा समितीने एकमताने निर्णय घेतला.

<u>ठराव क्रमांक 142</u>:– मौजा – जयताळा, खसरा क्र. 119 व 121/3, या जागेवरील आरक्षण क्र. MW-46 (Secondary School) क्षेत्र –4.12 हे. आर. जागा संपादित करण्याबाबत.

मौजा–जयताळा, खसरा क्र. 119व 121/3, या जागेवरील आरक्षण क्र. MW-46 (Secondary School) क्षेत्र –4.12 हे.आर. या जागेचे मालक श्री मनिष मधुकरराव गुडधे व इतर, यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम –1996, चे कलम –127 अन्वये दिनांक 01.02.2013 रोजी खरेदी सुचना महानगरपालिकेस बजावली आहे.

सदर्हु जागेचे भुसंपादन करण्याकरीता कार्यलयीन पत्र क्र. मनपाना/नरवि/1408 दिनांक 27.02.2013 अन्वये जागेच्या मोबदल्यात टी.डी.आर. घेण्यासाठी कळविले होते. आवेदकाने जमिनीचा मोबदला टी.डी.आर. स्वरूपात घेण्याचे दिनांक 11.03.2013 चे पत्रानुसार नाकारले असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम –1966 चे कलम –125व 126 मध्ये नमूद नुसार भुसंपादन अधिनियम –1894 अन्वये भुसंपानदासाठी कलम –6 ची अधिसुचना काढुन भुसंपादनाची कार्यवाही करणे गरजेचे आहे. भुसंपादनाची कार्यवाही न केल्यास जागेवरील आरक्षण व्यपगत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर्हु जागेचे भुसंपादनाकरीता अंदाजीत रक्कम वर्ष 2013–2014 चे शिघ्रगणका नुसार रू. 83,15,19,000/– ची तरतुद मिळण्यासाठी सदरर्हु प्रस्तावास स्थायी समितीने अंतिम निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयातील प्रकरणात जमिनीवरील विकास योजनेचे आरक्षण व्यपगत झाल्यामुळे व प्रशासनाने विहीत कालावधीत प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविला नाही असे स्पष्ट झाल्यामुळे या प्रकरणात प्रशासनाने आपल्या स्तरावर नियमानुसार व कायदयाच्या चाकोरीत निर्णय घ्यावा या सुचनेस एकमताने मंजूरी प्रदान करते.

सदर्हु प्रकरणात विकास योजनेतील सार्वजनीक प्रयोजनासाठीचे आरक्षण व्यपगत झाले असे दिसुन येते त्यामुळे या प्रकरणात दोषी विरुध्द प्राथमिक चौकशी सूरु करण्याचे निर्देश हि स्थायी समिती प्रशासनास देते असा समितीने एकमताने निर्णय घेतला.

<u>ठराव क्रमांक 143</u>:— प्रभाग क्र. 15 अ आणि ब विनोबा भावे नगर, नागसेनवन येथे सिमेंट कॉक्रीट पेव्हमेंटचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त 7 निविदापैकी मे. गोविंद कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा 8. 72 प्रतिशतने अधिक दराची व नवीन सी.एस.आर. नुसार प्राकलनीय दराची रू. 32,61,640/— (बत्तीस लक्ष एकसष्ठ हजार सहाशे रूपये फक्त) रकमेची सुधारीत निविदा, कामाचा खर्च मुळ प्राकलनीय राशी रू. 29,99,840/— पर्यंत सिमीत राहील या अटीवर स्विकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 144</u>:— प्रभाग क्र. 30 ब बाजीराव मोहल्ला, कोलबास्वामी मठ, देवघरपूरा, जागनाथ बुधवारी भागातील रस्त्यांचे सिमेंटीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त 10 निविदांपैकी मे. अमित कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरांपेक्षा 33.63 प्रतिशत ने कमी दरांची रू. 29,86,200/— (अक्षरी एकोणतीस लक्ष छाहान्सी हजार दोनशे रूपये) रकमेची निम्नतम निविदा पूढील अटीवर स्विकृत करण्याचा व या कामास्तव प्रावधान उपलबध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. त्यांचे प्रथम धावत्या देयकातून 18.63 टक्के अतिरिक्त सुरक्षा ठेव वसूल करण्यात येईल यांस स्थायी समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. हि सुरक्षा ठेव दोष दायीत्व कालावधी पूर्ण संपल्यानंतर काम गुणवत्तापूर्वक आढळल्यानंतरच परत करण्यात येईल यांस स्थायी समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 145</u>:— धरमपेठ झोनमधील प्रात्यक्षिक क्षेत्रात 24X7 पाणीपुरवठा योजना अंमलात आल्यामुळे उपभोक्त्यांचे आंतरिक जलवाहिन्यांमधून गळतीमुळे वाया गेलेल्या पाण्यामुळे प्रती कुंटुंब प्रती महिना 50 युनीटपेक्षा अधिक नोंद झालेली पाणीपट्टीची रक्कम वसुल होण्याजोगी नसल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 152 नुसार खालीलप्रमाणे रक्कम निर्लेखित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1. धरमपेठ झान मधील 24x7 पाणीपुरवठा प्रात्यक्षिक क्षेत्रातील एकुण 3327 उपभोक्त्यांना 50 युनीट प्रती कुंटुब प्रती महिना प्रमाणे येणाऱ्या पाणीवापरापेक्षा अधिक पाणीवापराकरीता 01.04.2009 ते 30.09.2010 या कालावधीत देण्यात आलेली पाणीपट्टीची विलंब शुल्कासह येणारी एकुण रू. 3,08,82,343/— ची रक्कम निर्लेखित करणे व त्यानुसार सर्व संबंधीत उपभोक्त्यांची देयके दुरूस्त करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. तसेच यापुढे डिसेंबर 2010 पर्यंत देण्यात येणारी अशाप्रकारची देयके 50 युनिट प्रती कुटुंब प्रती महिना प्रमाणे विभागीय स्तरावर दुरूस्ती करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 146** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर